महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

## प्रेसनोट

दिनांक :- १७/०१/२०२४

## सिन्नर येथील संजीवनगर परिसरात महिलेचा खून करणा-या नराधमास जन्मठेपेची शिक्षा

---

दिनांक १७/०१/२०२४ रोजी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयातील प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. जगमलानी सो. यांचे न्यायालयात सिन्नर पोलीस ठाणे गुरनं ३३८/२०१९ भादवि कलम ३०२ प्रमाणे दाखल खटल्याची सुनावणी पुर्ण होवून सदर गुन्हयातील **आरोपी** नामे **दुर्वेश गेंदालाल चौरे,** वय ३०, रा. शिवनगर कॉलनी, जिल्हा भोपाळ, राज्य मध्यप्रदेश याचेविरुध्द आरोप सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने सदर आरोपीतास भादवि कलम ३०२ खाली जन्मठेपेची शिक्षा व १०,०००/- रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरची घटना दि. २१/०९/२०१९ रोजी १२:३७ वा. चे दरम्यान सिन्नर शहरातील संजीवनगर परिसरात घडलेली होती. सदर गुन्हयातील आरोपी नामे दुर्वेश गेंदालाल चौरे याने यातील मयत महिला नामे रेखा मेहरा, वय २९, रा. भोपाळ, हल्ली संजीवनगर, सिन्नर हिचा ओढणीने गळा आवळून जिवे ठार मारले होते. सदर गुन्हयात फिर्यादी सपोउनि जी.व्ही. परदेशी, नेमणूक सिन्नर पोलीस ठाणे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपीस सिन्नर पोलीसांनी अटक केली होती.

सदर गुन्हयाचा तपास सिन्नर पोलीस ठाणेस नेमणूकीस असलेले तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. साहेबराव पाटील यांनी केला होता. त्यांनी आरोपीविरूध्द भक्कम पुरावे गोळा करून मा.सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. कडवे सो. यांनी, तसेच पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा मधुकर पाडवी, मपोहवा जे.के.निकाळे यांनी काम पाहीले असून यातील आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत झाला आहे.